I CAN

THE EARTHSHOT PRIZE

DESIGN for CHANGE

alana

अर्थशॉट चॅलेंज

"सर्व जीवजंतू हे आपल्या सुंदर ग्रहाला घर मानतात, त्यांच्यासाठी आपण त्याचे संरक्षण करू शकतो, या दशकात आपण केलेल्या निवडी आपल्याला परिभाषित करतील, परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते तरुण लोकांचे जीवन परिभाषित करतील.

महामहिम प्रिन्स विल्यम | संस्थापक आणि अध्यक्ष, द अर्थशॉट प्राईझ.
5 नोव्हेंबर, द अर्थशॉट प्राईझ पुरस्कार सोहळा 2026, रिओ दी जानेरो.

प्रिय एज्युहिरो,

आपल्या ग्रहाचे भविष्य आज आपण करत असलेल्या निवडीवर अवलंबून आहे.

जगभरातील समुदायांना हवामान बदल, प्रदूषण, जंगले आणि वन्यजीवांचे नुकसान तसेच वाढत्या कचऱ्यासारख्या पर्यावरणीय आव्हानांचा सामना करावा लागत आहे. हे प्रश्न तातडीचे असले तरी, शास्त्रज्ञ, शेतकरी, उद्योजक, समुदाय नेते आणि तरुणांकडून प्रेरणादायी उपाययोजना आधीच तयार केल्या जात आहेत.

धाडसी पर्यावरणीय उपाय शोधण्यासाठी, अंमलात आणण्यासाठी आणि त्यांना पाठबळ देण्यासाठी अर्थशॉट पुरस्कार तयार करण्यात आला होता. **आणीबाणी + आशावाद = कृती** या विश्वासाने मार्गदर्शित, हे स्वच्छ, निरोगी आणि सुरक्षित भविष्यासाठी काम करणाऱ्या लोकांना आणि कल्पनांना ठळकपणे समोर आणते.

आता, ही तुमच्या मुलांसाठीची संधी आहे.

द अर्थशॉट आय कॅन चॅलेंजद्वारे 9 ते 17 वयोगटातील मुलांना स्थानिक समस्या ओळखण्यासाठी, उपाययोजना तयार करण्यासाठी आणि आपल्या ग्रहाची पुनर्स्थापना करण्यात मदत करण्यासंदर्भात कृती करण्यासाठी आमंत्रित केले जात आहे. मुलांना त्यांच्या कल्पना महत्त्वाच्या आहेत हे दाखवून, आपण त्यांना त्यांच्या शाळांमध्ये, घरांमध्ये आणि समुदायांमध्ये आत्मविश्वासाने बदल घडवून आणणारे बनण्यास मदत करू शकतो.

डिझाइन फॉर चेंज, द अलाना फाउंडेशन आणि द अर्थशॉट प्राईझ यांच्याद्वारे भारतभरातील मुलांना त्यांची 'आय कॅन' सर्वोच्च शक्ती ओळखण्यासाठी आणि सकारात्मक बदल घडवणाऱ्या तरुणांच्या वाढत्या चळवळीत सामील होण्यासाठी आमंत्रित केले जात आहे.

एकत्रितपणे, ते सर्वांसाठी स्वच्छ, निरोगी आणि अधिक शाश्वत भविष्य घडविण्यात मदत करू शकतात

जेसन नॉफ,
मुख्य कार्यकारी अधिकारी
अर्थशॉट प्राईझ

किरण बीर सेठी,
संस्थापक, डिझाइन फॉर चेंज

पेड्रो हार्टुंग,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
अलाना फाउंडेशन

चॅलेंजची अंमलबजावणी करणारे भागीदार

DESIGN for CHANGE INDIA

कार्यक्रम भागीदार

MuSo Museum of Solutions
a JSW initiative

तुम्ही तयार आहात का?

3 ते 5 संघ सदस्यांचे सुपर स्क्वाड्स तयार करा.
आता या 4 पायऱ्यांचे पालन करा

5 विजेत्यांना मिळणार प्रत्येकी $2000 चे अनुदान

एक ज्यूरी **25 प्रकल्पांची** निवड करेल आणि **5 विजेत्यांची निवड करेल (प्रत्येक अर्थशॉट श्रेणीमधून 1).**

विजेत्यांना **प्रत्येकी $2000 चे अनुदान**, त्यांना मदत करण्यासाठी एक मार्गदर्शक आणि मुंबईतील **द अर्थशॉट प्राईझ ॲवॉर्ड्स आणि शिखर परिषदेचे** आमंत्रण मिळेल.

विजेत्यांनी वेळोवेळी डी.एफ.सी. आणि अर्थशॉट यांना वेळोवेळी प्रगती कळवत राहणे आवश्यक आहे.

पायरी 1
जाणवू द्या
तुमच्या हृदयापासून विचार करा

1. निरीक्षण करा

तुमच्या आजूबाजूच्या परिसराकडे बारकाईने पहा.

तुम्हाला त्रास देणाऱ्या पर्यावरणीय आव्हानांशी संबंधित गोष्टींचे निरीक्षण करा. तुमच्या निरीक्षणांचा नकाशा तयार करा - यांद्वारे तुमच्या जगाचा नकाशा तयार करा:

- तुम्हाला जे दिसते (उदा.: प्रदूषण, पाण्याची टंचाई, ऊर्जेचा अपव्यय इ.)
- तुम्हाला जे जाणवते (उदा.: हताश, जबाबदार, जिज्ञासू इ.)
- तुम्ही जे ऐकता (उदा.: समुदायाच्या समस्या, बातम्या इ.)

2. अर्थशॉट श्रेणीशी जोडले जा

एका संघाच्या रुपात तुमच्या निरीक्षणांविषयी चर्चा करा.
तुमचे चॅलेंज अर्थशॉटच्या कोणत्या श्रेणीशी जोडले जाते?

- निसर्गाचे संरक्षण आणि पुनःस्थापन करा
- आपल्या महासागरांना पुनरुज्जीवित करा
- आपले हवामान स्थिर करणे
- आपली हवा स्वच्छ करा
- कचरा-मुक्त जग तयार करा

3. मत द्या

तुमची निरीक्षणे तुमच्या संघासोबत सामायिक करा आणि ज्या चॅलेंजला तुम्ही सर्वजण बदललेले पाहू इच्छिता त्या एका चॅलेंजसाठी मत द्या.

4. सखोलपणे अभ्यासा

तुमचे चॅलेंज निवडल्यानंतर ते अधिक चांगल्याप्रकारे समजून घेण्यासाठी सखोलपणे अभ्यास करा. असे करण्यात तुम्हाला मदत करण्यासाठी इथे काही प्रश्न दिलेले आहेत.

- ते केव्हा आणि कोठे घडले?
- त्यामुळे कोणावर परिणाम होत आहे?
- ते लोक, प्राणी आणि निसर्गावर कशाप्रकारे प्रभावित करत आहे?

5. गुंतून जा

आता, त्या परिस्थितीत गुंतलेल्या आणि प्रभावित असलेल्या लोकांकडे जा आणि बोला. त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी त्यांची मुलाखत घ्या जेणेकरून तुम्ही तुमचा तोडगा त्यांच्यासाठी नव्हे तर त्यांच्यासोबत ठरवू शकाल

पायरी 2
कल्पना करा
यशाची कल्पना करा

1. विचारमंथन साधने

- सगळ्या कल्पना छान आहेत. विचित्र कल्पनांपासून दूर पळू नका.
- इतरांच्या कल्पनांवर उभारणी करा - 'पण' ऐवजी 'आणि' हा शब्द वापरा.
- अधिक स्पष्टतेसाठी तुमच्या कल्पना स्पष्ट करा

तुम्ही अनेक कल्पना आणि उपाय तयार केल्यानंतर, तुम्ही अंमलात आणणार असलेल्या उपायांची निवड करण्यासाठी **क्यू.बी.एल.** साधनाचा वापर करा. तुमची उपाययोजना अशी असावी:

अंमलबजावणीस **जलद**
धाडसी असावी
दीर्घकालिक परिणाम करणारी असावी

2. मत द्या

तुमच्या निवडलेल्या चॅलेंजचे सर्वोत्तम निराकरण करणाऱ्या कल्पनांसाठी मत द्या.

एक शक्तिशाली उपाययोजना तयार करण्यासाठी अनेक कल्पना एकत्र करण्याचा प्रयत्न करा.

अर्थशॉटच्या अंतिम स्पर्धकांसारखा विचार करा, स्वतःला विचारा:

- ही उपाययोजना बऱ्याच लोकांना कशी मदत करू शकते?
- ती निसर्गाला आणि आपल्या पर्यावरणालाही मदत करू शकते का?
- ती सर्जनशील आणि धाडसी आहे का?
- इतर शाळा किंवा समुदाय तिची पुनरावृत्ती करू शकतात का?
- ती बराच काळ टिकू शकेल का? ती परवडणारी आहे की व्यवहार्य आहे?

पायरी 3
हे करा
बदल प्रत्यक्षात घडवा

1. आखणी करा

नियोजन करताना खालील गोष्टी लक्षात घ्या:

- कोणते स्रोत आवश्यक असतील?
- अंदाजपत्रक काय आहे?
- तुम्हाला पैसे कसे मिळतील?
- किती लोकांची आवश्यकता असेल?
- यासाठी किती कालावधी लागेल?
- तुम्ही तुमच्या कामाचे दस्तऐवजीकरण कसे कराल?

तुमची ताकद लक्षात घेऊन तुमच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या निवडा.

2. अंमलबजावणी करा

बाहेर पडा आणि तुमच्या नियोजनावर कृती करा.
होय, तुम्ही करू शकता!

3. प्रतिबिंबित करा

- परिस्थितीबाबत कोणत्या 3 गोष्टी तुम्ही शिकलात?
- तुमच्या संघ-सहकाऱ्यांबाबत कोणत्या 2 गोष्टी तुम्ही शिकलात?
- तुमच्या स्वतःबद्दल कोणती 1 गोष्ट तुम्ही शिकलात?

तुमच्या प्रकल्पाचा प्रभाव टिकवून ठेवण्याच्या मार्गांचा विचार करा?

अर्थशॉट पुरस्कार **प्रेरणादायी, विस्तारक्षम, सर्जनशील, सर्वसमावेशक, व्यावहारिक आणि आशावादी** उपाययोजनांना समर्थित करतो. तुमच्या अर्थशॉट क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, नवप्रवर्तक, शास्त्रज्ञ किंवा व्यावसायिकांशी संपर्क साधा

पायरी 4
सामायिक करा
मी करू शकतो! आता, तुम्हीसुद्धा करू शकता.

1. सबमिट करा

challenge.dfcworld.com वर तुमचा प्रकल्प आमच्यासोबत सामायिक करा

कृपया संकेतस्थळावर दिलेल्या सबमिशनच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करा. तुम्ही एकतर **छायाचित्र कथा** किंवा **चित्रफीत कथा** सादर करू शकता.

एफ.आय.डी.एस. च्या प्रत्येक टप्प्याखाली प्रश्नांची उत्तरे द्या.
छायाचित्र कथा: प्रत्येक पायरी दर्शविण्यासाठी छायाचित्र अपलोड करा, तुमच्या संपूर्ण प्रकल्प प्रक्रियेचे दस्तऐवजीकरण करण्याचे लक्षात ठेवा.

चित्रफित कथा: तुमच्या प्रकल्प प्रक्रियेचे व्हिडिओ म्हणून दस्तऐवजीकरण करा, ती यूट्यूबवर अपलोड करा आणि सबमिशन प्लॅटफॉर्मवर यूट्यूब शेअर लिंक पेस्ट करा.

कृपया लक्षात ठेवा
तुम्ही जास्तीत जास्त 16 फोटो अपलोड करू शकता, प्रत्येक पायरीसाठी 4, जर तुम्ही व्हिडिओ बनवत असाल तर तो 3 मिनिटांपेक्षा जास्त असू शकत नाही.

2. प्रेरित करा

तुमच्या कथेची जादू पसरवण्यासाठी येथे काही कल्पना दिल्या आहेत :-)

- शालेय सभा
- वृत्तपत्रातील लेख
- दूरचित्रवाणी कार्यक्रम
- रेडिओ
- सोशल मीडिया
- सादरीकरण
- सामुदायिक प्रदर्शन
- कला किंवा नाट्य सादरीकरण
- विज्ञान जत्रा
- पर्यावरण मंडळाचे सादरीकरण

#ICANEarthshotChallenge
(#आयकॅनअर्थशॉटचॅलेंज) वापरा

challenge.dfcworld.org
वर तुमचा प्रकल्प सबमिट करा

I CAN अर्थशॉट चॅलेंज

आय कॅन अर्थशॉट चॅलेंज मुले आणि तरुणांना पर्यावरण बदल घडवणारे होण्यासाठी आमंत्रित करतो. निसर्गाचे **संरक्षण आणि पुनःस्थापना करणे, आपली हवा स्वच्छ राखणे, आपल्या महासागरांना पुनरुज्जीवित करणे, कचरा-मुक्त जग तयार करणे आणि आपल्या हवामानाला स्थिर करणे** या पाच श्रेणींवर तो लक्ष केंद्रित करतो.

जाणवू द्या, कल्पना करा, हे करा, (एफ.आय.डी.एस.) आराखडा सामायिक करणे यांचा वापर करून, मुले त्यांच्या समुदायातील आव्हाने ओळखतील आणि एक किंवा अधिक अर्थशॉट उद्दिष्टे पूर्ण करण्यास मदत करणाऱ्या उपाययोजना विकसित करतील. **"आम्ही कसे करू शकतो..."** आणि **"साठी संधींचा शोध घ्या..."** या सूचना कल्पना जागृत करण्यासाठी तयार केल्या गेल्या आहेत, उत्तरे देण्यासाठी नाही. तुमच्या स्थानिक समुदायातील आव्हाने आणि संधी शोधण्यासाठी तसेच लोकांसाठी व पृथ्वीसाठी सकारात्मक बदल घडवून आणू शकतील अशा नाविन्यपूर्ण कृती तयार करण्यासाठी त्यांचा वापर करा.

निसर्गाचे संरक्षण करा आणि त्यास पुनःस्थापित करा

स्वतःला विचारा: **आम्ही कसे करू शकतो...**

- स्थानिक वनस्पती, वन्यजीव व जैवविविधता यांची भरभराट होऊ शकेल अशा जागा तयार करा.
- जलसंधारण आणि नैसर्गिक स्रोतांचे संरक्षण करण्यासाठी नाविन्यपूर्ण मार्ग विकसित करा.
- सामायिक जागा स्वच्छ ठेवण्यासाठी व परिसंस्थेचे रक्षण करण्यासाठी सामुदायिक कृतीसाठी प्रेरणा द्या.

प्रेरणा
भारतातील खेती (Kheyti) शेतकऱ्यांना कमी पाणी वापरताना अधिक अन्न पिकवण्यास मदत करते.

आपल्या हवेस स्वच्छ राखा

यासाठी संधींचा शोध घ्या:

- लोक आणि निसर्गासाठी हरित, आरोग्यदायी जागा निर्माण करणे.
- प्रदूषण कमी करण्याचे आणि हवेची गुणवत्ता सुधारण्याचे मार्ग शोधणे.
- चालणे, सायकल चालवणे आणि सामायिक वाहतूक यासह शाश्वत प्रवासाला प्रोत्साहन देणे.

प्रेरणा
केनियातील मुकुरु क्लीन स्टोव्हज हानिकारक घरगुती वायू प्रदूषण कमी करतात

आपल्या महासागरांना पुनरुज्जीवित करा

यासाठी संधींचा शोध घ्या:

- नद्या, महासागर आणि इतर जलस्रोतांचे प्रदूषणापासून संरक्षण करणे.
- पुनर्वापर, पुनःचक्रण आणि जबाबदार वापराला प्रोत्साहन देऊन अपशिष्ट कमी करणे.
- परिसंस्था स्वच्छ आणि निरोगी ठेवण्यासाठी सामुदायिक कृती प्रेरित करणे.

प्रेरणा
ऑस्ट्रेलियातील स्थानिक महिला रेंजर्स परिसंस्थांचे संरक्षण करण्यासाठी पारंपरिक ज्ञान आणि तंत्रज्ञानाचा एकत्रितपणे उपयोग करतात.

कचरा-मुक्त जग तयार करणे

स्वतःला विचारा: **आम्ही कसे करू शकतो...**

- दुरुस्ती, सामायिकीरण आणि पुनर्वापराद्वारे उत्पादने व सामग्रीचे आयुष्य वाढवणे.
- पुनर्वापर करण्यायोग्य पर्याय निवडून आणि कचऱ्याची वर्गवारी सुधारून कचरा कमी करणे.
- मौल्यवान स्रोत पुनर्प्राप्त करणे आणि पोषक तत्वे पर्यावरणाकडे परत आणणे

प्रेरणा
यू.के. मधील नोटप्ला, प्लास्टिक पॅकेजिंगसाठी समुद्री शैवाल-आधारित पर्याय तयार करते

आपल्या हवामानास स्थिर करा

यासाठी संधींचा शोध घ्या:

- तुमच्या समाजात स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जा उपाययोजनांना प्रोत्साहन द्या.
- ऊर्जेचा वापर कमी करा व कमी कार्बनयुक्त जीवनशैलीच्या तसेच प्रवासाच्या मार्गांना पाठबळ द्या.
- बदलत्या हवामानाच्या परिणामांशी जुळवून घेण्यासाठी लोकांना आणि नैसर्गिक जागांना मदत करा.

प्रेरणा
बांगलादेशातील फ्रेंडशिप (Friendship) समुदायांना हवामानाशी संबंधित आव्हानांना प्रतिसाद देण्यास मदत करते.

www.designforchangeindia.com/earthshot-challenge | #ICANEarthshotChallenge

THE EARTHSHOT PRIZE

DESIGN for CHANGE

alana

चॅलेंजची अंमलबजावणी करणारे भागीदार
DESIGN for CHANGE INDIA

कार्यक्रम भागीदार
MuSo Museum of Solutions